# कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जा.क्र. कृअम / भांडार / ७६२ / २०२३

दि. २३ / १० / २०२३

## जाहीर सुचना / निवेदन

कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत विविध विभागातील भांडारातील लाकडी व इतर भंगार / निरोपयोगी साहित्य / लोखंड व तत्सम वस्तू/ साहित्य (लॉट क्र. १ ते लॉट क्र. २ वेगवेगळे किंवा एकत्रित) यांचा लिलाव करण्यासाठी विहीत नमुन्यातील निविदा दरपत्रके मोहरबंद लिफाफ्यात दिनांक २५/१०/२०२३ ते ०२/११/२०२३ पर्यंत मा. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी यांच्या नावे मागविण्यात येत आहेत.

लिलावाच्या निविदा दरपत्रकाचा विहीत नमुना खरेदीस्तव प्रती रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) मा. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी येथे रोखपाल यांच्या कार्यालयात रोखीने भरणा केल्यानंतर निविदा दरपत्रक नमुना लिलावाच्या अटी / शर्तीची विस्तृत माहितीसह दिनांक २५/१०/२०२३ ते ३१/१०/२०२३ पर्यंत भांडार विभाग, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते ४.०० पर्यंत खरेदीसाठी उपलब्ध आहेत. मोहरबंद लिफाफ्यांतील दरपत्रक दाखल करण्याची अंतीम तारीख ०२/११/२०२३ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) असेल. मोहरबंद लिफाफ्यांतील निविदा मा. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी यांच्या दालनात दिनांक ०३/११/२०२३ रोजी सकाळी १२.०० वाजता लिलाव समिती व दरपत्रक पुरवठा धारकासमोर उघडण्यात येतील.

**सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य**
**कृषि अभि. व तंत्र. महाविद्यालय**
**वनामकृवि, परभणी**